ARTHA, Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें प्रमुख मराठी वृत्तपत्र

स्थापना : १९३५

# अर्थ

“अर्थ एव प्रधानः” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व तिसऱ्या बुधवारीं प्रसिद्ध होतें.

वार्षिक वर्गणी : ६ रु.

टेलि. ५५६२७

दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष ३१ | पुणें, बुधवार, १७ फेब्रुवारी, १९६५ | अंक ४

## विविध माहिती

**औद्योगिक प्रदर्शनांत भारताचें दालन**—पश्चिम जर्मनींत हॅनोव्हर ह्या ठिकाणीं येत्या एप्रिलच्या अखेरीस एक आंतरराष्ट्रीय औद्योगिक प्रदर्शन भरविण्यांत येणार आहे. ह्या प्रदर्शनांत २९ देशांतील ५,८०० कंपन्या आपला माल मांडणार आहेत. भारतहि आपलें एक दालन प्रदर्शनांत उघडणार आहे. दालनांत इंजिनिअरिंग निर्यात मंडळातर्फे इंजिनिअरिंगचीं हत्यारें, छोटीं यंत्रें, जागोजाग सहज हलवतां येणारीं विजेचीं हत्यारें, इत्यादि माल ठेवण्यांत येईल.

**गोदावरीवर नवा पूल**—नांदेड जिल्ह्यांत गोदावरी नदीवर बांधण्यांत यावयाच्या नव्या पुलाचा पायाभरणी समारंभ संरक्षण-मंत्री श्री. यशवंतराव चव्हाण ह्यांच्या हस्तें करण्यांत आला. मराठवाड्याच्या विकासासाठीं जी ४ कोटी रुपयांची योजना आखण्यांत आली आहे तिच्यांतील एक काम म्हणून हा पूल बांधण्यांत येत आहे. त्याच्या बांधकामासाठीं ७ लाख रुपये लागतील व त्याच्या योगानें जिल्ह्याचे उत्तर व दक्षिण भाग जोडले जातील.

**धान्यसांठा करण्यांत व्यत्यय**—अमेरिकेच्या पूर्व किनाऱ्यावरील बंदरांत झालेल्या संपामुळें भारताला पुरविण्यांत येणाऱ्या गव्हाचा सांठा वेळापत्रकापेक्षा ४ लाख टनांनीं मागें पडला आहे. त्यामुळें १० लाख टन गव्हाचा सांठा करून ठेवण्याच्या सरकारी योजनेलाहि विलंब लागणार आहे. अमेरिकेकडून भारताला दरमहा ६ लाख टन गव्हाचा पुरवठा सध्यां करण्यांत येत आहे.

**हातमागाचें कापड विमानानें रवाना**—मद्रास राज्यांत हातमागावर काढण्यांत येणारें एक विशिष्ट प्रकारचें कापड मद्रासहून न्यूयॉर्कला बोइंग विमानानें पाठविण्यांत आलें. ४ लाख वार असलेल्या ह्या कापडाची किंमत सुमारें १२ लाख रुपये आहे. अमेरिकेंतील आयातदारानेंच हें भाड्याचें विमान मुद्दाम पाठविलें होतें. वास्तविक नेहमींच्या पद्धतीनें कापड बोटीनें रवाना होतें. परंतु अमेरिकेच्या बंदरांतील संपामुळें तो मार्ग बंद झाला होता.

**उसाच्या शेतीसाठीं खर्च**—४ थ्या पंचवार्षिक योजनेच्या कालांत उसाच्या शेतीचा विकास घडवून आणण्यासाठीं मध्यवर्ती सरकारनें ९० कोटी रुपये खर्च करण्याचें ठरविलें आहे. ही रक्कम निरनिराळ्या राज्यांना कर्ज व मदत ह्या मार्गानें पोंचविण्यांत येईल. ६४ कोटी रुपये कर्जाच्या रूपानें आणि २६ कोटी रुपये मदतीच्या रूपानें देण्यांत येतील. कार्यक्रमांतील उसाच्या विकासाची व संशोधनाची योजना तयार करण्यांत येत आहे. ऊस-विषयक संशोधनावर २·१४ कोटी रुपये खर्च होण्याची शक्यता आहे.

**पंजाबांत कागदाचा कारखाना**—पंजाबांत नांगलजवळ वृत्तपत्रांना लागणारा कागद तयार करण्याचा कारखाना उभारण्यांत येणार आहे. संकल्पित कारखान्यांत रोज १०० टन कागद तयार करूं शकणारी यंत्रसामग्री बसविण्यांत येईल. कारखान्याच्या उभारणीच्या कामीं कॅनडांतील एका कारखान्याचें साह्य घेण्यांत येत आहे. उभारणीसाठीं एकूण भांडवल १२·५ कोटी रुपये लागेल.

**विन्स्टन चर्चिल ह्यांचा दफनविधि**—ख्रिस्तवासी विन्स्टन चर्चिल ह्यांच्या पार्थिव देहाचा दफनविधि ब्लॅडन ह्या खेडेगांवांतील स्मशानभूमींत साध्या रीतीनें करण्यांत आला. शवपेटिका पुरण्यांत आली त्या वेळीं त्यांचे अगदीं जवळचे नातलग व कांहीं घरोब्याचे स्नेहीच फक्त हजर होते. लंडनहून त्यांचें शव घेऊन जाणारी खास गाडीच सोडण्यांत आली. गाडीला दुसऱ्या महायुद्धांत कामगिरी बजावलेलें ‘ विन्स्टन एस. चर्चिल ’ हें रेल्वे इंजिन जोडण्यांत आलें होतें.

**नेपाळी निर्वासित परतले**—ब्रह्मदेशाच्या सरकारनें केलेल्या राष्ट्रीयीकरणाच्या कायद्यामुळें ६ हजार नेपाळी नागरिकांना मायदेशीं परतावें लागलें आहे. नेपाळी नागरिकांची ब्रह्मदेशांतील संख्या ७० हजारांच्या आसपास आहे. परतण्याच्या वेळीं प्रत्येक नागरिकाला फक्त ७५ रुपये बरोबर घेऊं देण्यांत आले. त्यांना आपली सर्व स्थावर व जंगम मालमत्ता तेथेंच सोडून यावें लागलें.

**मॅलेशियन वैमानिकांना शिक्षण**—मॅलेशिआचे माहितीखात्याचे मंत्री भारताला भेट देऊन परत गेले. त्यांनीं कुआलालंपूर येथें असें जाहीर केलें आहे कीं, भारतानें मॅलेशिअन वैमानिकांना शिक्षण देण्याचें मान्य केलें आहे. तथापि ह्यांत नवीन असें कांहीं नाहीं. कारण, भारतानें इंडोनेशिआच्या वैमानिकांनाहि पूर्वी शिकवून तयार केलें आहे.

**रुमेनिआची मदतीची तयारी**—नूनमती येथील तेल शुद्धीच्या कारखान्याचा विस्तार करण्याच्या कामीं रुमेनिअन सरकारशीं बोलणीं चालूं आहेत. त्याशिवाय हाल्डिआ येथें काढण्यांत यावयाच्या तेलशुद्धीच्या व रासायनिक कारखान्यांच्या स्थापनेसाठींहि मदत द्यावयाची तयारी रुमेनिआनें दाखविली आहे. नव्या मदतीचा आंकडा अद्याप ठरलेला नाहीं.

**नेपाळमधील साखर कारखाना**—खाटमांडूपासून १२० मैलांवर रशिआच्या मदतीनें उभारण्यांत आलेल्या साखर कारखान्याचें उद्घाटन राजे महेंद्र ह्यांच्या हस्तें झालें. कारखान्यांत रोज १ हजार टन ऊंस गाळूं शकणारी यंत्रसामग्री बसविण्यांत आली आहे. ह्या कारखान्यामुळें नेपाळ साखरेच्या बाबतींत कांहींसा स्वयंपूर्ण होईल.

### हातमागाच्या कापडासाठी निर्यात मंडळ

हातमागाच्या कापडधंद्याचा अभ्यास करण्यासाठी भारत सरकारनें एक मंडळ नेमलें होतें. मंडळानें ह्या प्रश्नाचा अभ्यास करून कांहीं शिफारसी केल्या आहेत. आपल्या अहवालांत मंडळानें असें सुचविलें आहे कीं, हातमागाच्या कापडाची निर्यात वाढविण्यासाठीं स्वतंत्र निर्यात मंडळ स्थापन करण्यांत यावें. त्याचप्रमाणें, ४ थ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या काळांत हातमागाच्या कापडाच्या निर्यातीचें उद्दिष्ट दरसाल २० कोटी रुपयांचें ठेवण्यांत यावें. ह्या कार्यक्रमांत भारताला १,१२० कोटी वार कापड लागेल. त्यांपैकी सुमारें ३०० कोटी वार कापड हातमाग पुरवूं शकतील असा मंडळाचा अंदाज आहे. ह्या कापडाला निर्यातीच्या बाजारपेठा मिळवून देतांना विणकरांना अधिक प्राप्ति होण्याची दृष्टि खास करून ठेवण्यांत यावी, असेहि सुचविण्यांत आलें आहे.

### मर्यादित युद्धासाठी चीनची तयारी

अणुस्फोट करणाऱ्या भयानक व प्रचंड शस्त्रास्त्रांच्या साह्यानें बड्या राष्ट्रांत युद्धाचा भडका उडण्याची शक्यता त्याच्या सर्वनाशक स्वरूपामुळें फारशी नाहीं, असा लष्करी तज्ज्ञांचा कयास आहे. मात्र मर्यादित स्वरूपाचीं छोटीं-मोठीं युद्धें नेहमींच शक्य आहेत. ह्या युद्धांत वापरण्यासाठीसुद्धां अणुस्फोट करणारीं छोटीं हत्यारें तयार झालीं आहेत. त्यांत पायदळासाठीं बंदुका, तोफखाना आणि छोटे अग्निबाण ह्यांचा समावेश आहे. अशा प्रकारचीं हत्यारें वापरून होणाऱ्या युद्धाचाहि सराव असावा लागतो. ही परिस्थिति लक्षांत घेऊन चीननें ४ वर्षांपूर्वीपासूनच आपल्या सैनिकांना जरूर ती तालीम देण्यास प्रारंभ केलेला आहे. छोटीं अण्वस्त्रें वापरल्यानें अणुस्फोटांमुळें उत्पन्न होणारे घातकी किरण कमी प्रमाणांत स्फुरतात.

### रेशमाच्या धंद्याच्या विकासाची योजना

मध्यवर्ती रेशीम मंडळानें रेशमाच्या धंद्याचा विकास करण्यासाठी एक योजना तयार केली आहे. नियोजन समितीनें तिला मंजुरी दिली असून पंजाब, हिमाचल प्रदेश, उत्तर प्रदेश व पश्चिम बंगाल ह्या भागांतील हिमालयानजीकच्या भागांत ती चालू करण्यांत येणार आहे. चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या काळांत रेशमाच्या उत्पादनांत वाढ करण्यासाठी १५ कोटी रुपयांची तरतूद करण्यांत यावी, अशी शिफारस मंडळानें केली आहे. ह्या धंद्यासाठीं तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत ७ कोटी रुपयांची तरतूद करण्यांत आलेली होती. रेशमाच्या किड्यांचे कोष तयार करण्यासाठी आणि रेशमाच्या उत्पादनासाठी सहकारी संघटना स्थापन करण्यावर भर देण्यांत येणार आहे. १९५८ मध्यें ३८ लाख रुपयांचें रेशीम निर्यात झालें होतें. गेल्या वर्षी ३ कोटी रुपयांचें रेशीम निर्यात करण्यांत आलें.

### बँकांना सवलत

महाराष्ट्र सरकारनें राज्यांतील सर्व बँकांना बाँबे स्टेट ॲन्ड एस्टॅब्लिशमेंटस ॲक्टाच्या कांहीं तरतुदींतून मुक्त केलें आहे. महिन्याचा पहिला दिवस आणि सार्वजनिक सुट्टीच्या आधीचा आणि पुढचा कामाचा दिवस, ह्या संबंधींतील त्या तरतुदी आहेत. ज्या नोकरांना त्यामुळें जादा तास काम करावें लागेल, त्यांना ओव्हरटाईम कामाचें वेतन मिळेल.


उसनें मागून
मित्र गमावूं नका !
किरकोळ हातउसने घेतांना बरं वाटेल.
पण त्यामुळें तुमचे मित्र दुरावतात.
त्यासाठीं
' खरा मित्र म्हणजे बचत '
त्यासाठी
' बेळगांव बँकेंत ' खातें उघडा !
क्युमिलेटिव्ह योजनेचा फायदा घ्या !
मुदतबंद ठेव ठेवा !
किंवा
तत्सम आमच्या अनेक उपयुक्त योजना समजावून घ्या !
बेळगांव बँक लिमिटेड
शेड्यूल्ड बँक : स्थापना : १९३०
रजिस्टर्ड ऑफिस : रविवार पेठ, बेळगांव
महाराष्ट्र व म्हैसूर राज्यांत ३५ शाखा
खेळता निधि ३ कोटींहून अधिक.



श्री. वा. काळे ह्यांचीं
कौटुंबिक व सामाजिक जीवनावरील पुस्तकें
१ कण आणि क्षण, २ पुढें पाऊल,
३ तुमचें स्थान कोणतें ?



भारतातील प्रमुख नागरी सहकारी बँक!
सारस्वत
को-ऑपरेटिव्ह बँक लि.
सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई ४.

| | | | |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | ... | रु. | १० लाख |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | ... | रु. | १५ ,, |
| ठेवी | ... | रु. | ४१४ ,, |
| खेळतें भांडवल | ... | रु. | ४५० ,, |

शाखा : फोर्ट, दादर, माहीम, वरळी, वडाळा, पुणें ५

बेळगांव. महिला शाखा : सारस्वत बँक-गृह, निकदवरी लेन, मुंबई ४.
स्थापना १९१८

# अर्थ

बुधवार, १७ फेब्रुवारी, १९६५



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## अर्बन सहकारी बँकांकडून अपेक्षा

### लहान उद्योगधंद्यांना मदत

बॉंबे मर्कंटाइल को. बँकेच्या रौप्यमहोत्सवाच्या अध्यक्षस्थानावरून बोलतांना रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर श्री. पी. सी. भट्टाचार्य ह्यांनीं सहकारी अर्बन बँकिंगसंबंधीं महत्त्वाचे व मार्गदर्शक उद्गार काढले. ते म्हणाले कीं, आर्थिक अभ्युदयाचें साधन ह्या दृष्टीनें सहकारास गेल्या दहा वर्षांत वाढती मान्यता मिळत गेली आहे; त्यामुळें सहकाराचें क्षेत्रहि वाढत आहे. त्यांत अर्बन सहकारी बँकांना बरीच कामगिरी करतां येण्याजोगी आहे. आर्थिक उपक्रम करणाऱ्या शहरांतील कित्येक लोकांना व्यापारी बँकांकडून कर्जे मिळविणें अवघड जातें. अर्बन सहकारी बँका ह्या मुख्यत्वेंकरून मर्यादित प्राप्तीच्या लोकांच्याच बँका असल्यानें त्यांना अशांच्या गरजांबद्दल जास्त सहानुभूति वाटावी हें स्वाभाविक आहे. लहान कारखान्यांना त्यांनीं विशेष साहाय्य करावें, इतकेंच नव्हें तर छोटे कारखानदार आणि व्यापारी ह्यांना मार्गदर्शनहि करावें. हें करतां येण्यासाठीं, त्यांनीं स्वतः छोट्या उद्योगधंद्यांच्या आर्थिक व तांत्रिक बाजूंचा अभ्यास करायला हवा. मध्यवर्ती आणि राज्य सरकारांकडून मिळणाऱ्या विविध सवलतींची त्यांनीं नीट माहिती करून घ्यायला हवी. लहान उद्योगधंद्यांना दिलेल्या कर्जांत अर्बन सहकारी बँकांना जर तोटा सोसावा लागला, तर त्याच्या कांहीं भागाची हमी रिझर्व्ह बँकेनें घेण्यास मान्यता दिली आहे; मात्र अशा कर्जांत राज्य सहकारी बँक किंवा स्टेट बँक हीं २५% पर्यंत तरी सहभागी असायला हवीं.

### शहरी बचतींतून ग्रामीण उद्धार

सहकारी बँकांची ठेवी गोळा करण्याची कामगिरीहि अधिकाधिक महत्त्व पावत आहे. आज कदाचित् अर्बन सहकारी बँका कर्जविषयक गरजा आपल्या ठेवींतून भागवूं शकत असतील; पण सहकारी उपक्रमांची कर्जविषयक मागणी वाढत जाणार आहे; विशेषतः शेतीच्या कर्जपुरवठ्याची मागणी एकसारखी वाढत आहे. रिझर्व्ह बँक सहकारी बँकांना त्यासाठी भरपूर साहाय्य करीत आहे. परंतु केंद्रीय आणि मध्यवर्ती सहकारी बँकांनीं आपल्या ठेवी वाढवीत नेल्या नाहींत, तर कांहीं वर्षांनीं अडचण निर्माण होण्याचा संभव आहे. त्या बँकांनीं स्वतःच्या शाखांच्याद्वारां, त्याचप्रमाणें संलग्न सहकारी सोसायट्यांच्या द्वारां ठेवी वाढवायला हव्यात. सहकारी संघटनेचें सांघिक स्वरूप आणि कर्जे देणाऱ्या सहकारी संस्थांवरील उपलब्ध पैशांची योग्य वांटणी करण्याची जबाबदारी, ह्यांत प्राथमिक सहकारी बँकांनीं स्वतःच्या जरुरीपेक्षा जास्त ठेवी जमा करण्याची आवश्यकता अभिप्रेतच आहे. ह्या दृष्टीनें, ग्रामीण पतपुरवठ्यास अर्बन सहकारी बँका मोलाची मदत करूं शकतील. कांहीं काळ तरी, ग्रामीण भागांत करावयाची भांडवली आणि चालू गुंतवणूक शहरी बचतीमधूनच प्राधान्यें करून पुरवावी लागेल. हा पुरवठा खासगी गुंतवणुकीच्या मार्गें होण्याची अपेक्षा बाळगणें चुकीचें होईल. म्हणून, शहरी बचत स्वतःकडे आकर्षणाऱ्या अर्बन सहकारी बँकांनाच तें काम करावें लागेल. अर्बन सहकारी बँकांचा सहकारी क्षेत्रास वाढता आधार मिळत गेला पाहिजे.

### अर्बन बँकांवर रिझर्व्ह बँकेचें नियंत्रण

डिसेंबर, १९६४ मध्यें भारत सरकारनें लोकसभेंत बँकिंग लॉज (ॲप्लिकेशन टु कोऑपरेटिव्ह सोसायटीज्) बिल मांडलें आहे. त्या बिलाचा उद्देश रिझर्व्ह बँक कायदा, आणि बँकिंग कंपन्यांचा कायदा ह्यांच्या कांहीं तरतुदी सहकारी बँकांना लागू करणें, हा आहे. अर्बन सहकारी बँकांपैकी ज्यांचें वसूल भाग भांडवल + गंगाजळी मिळून एक लक्ष रुपयांपेक्षा अधिक आहे, अशांना नवा कायदा लागू होईल. बँकांच्या एकूण कर्जपुरवठ्यांतील सहकारी कर्जपुरवठ्याचा हिस्सा महत्त्वाचा बनत चालला आहे आणि चलन व नाणेविषयक राष्ट्रीय धोरण परिणामकारक व्हावयाचें असेल तर त्याच्या अंमलबजावणींत सहकारी बँकाहि यायला हव्यात. ह्या प्रश्नाला दुसरीहि एक बाजू आहे. सहकारी बँकांनीं दिलेल्या कर्जांना शिस्तबद्ध योजनेचें बंधन नसल्यामुळें, त्या बँकांत पैसे ठेवण्यास जनता फारशी उत्सुक नसते. व्यापारी बँकांना रिझर्व्ह बँकेकडून ज्याप्रमाणें सल्ला आणि सूचना मिळतात, त्याचप्रमाणें सहकारी बँकांनाहि मिळत गेल्यास त्या बँकांच्या ठेवीदारांना आणि जनतेला एक प्रकारचा विश्वास वाटेल, कीं त्या बँकांवर रिझर्व्ह बँकेची देखरेख आहे; त्यांचीं धोरणें आणि व्यवहारपद्धति ह्यांची वरचेवर तपासणी होत आहे. ठेवीदारांचा विश्वास संपादन करण्यासाठी कांहीं विशिष्ट कार्यक्षमता आवश्यक असते आणि नव्या कायद्यामुळें अर्बन सहकारी बँकांच्या वाढीवर उत्कृष्ट परिणाम झाल्याविना राहणार नाहीं.

---

## चीनच्या बेजबाबदारीबद्दल धोक्याचा इशारा

अगदीं अलीकडेपर्यंत अणुबाँबच्या बनावटीचें रहस्य ब्रिटन, अमेरिका, फ्रान्स व रशिआ ह्या राष्ट्रांनाच माहीत होतें. परंतु दोनतीन महिन्यांपूर्वीं तें चीननेंहि हस्तगत केल्याचें उघड झालें आहे. अणुस्फोटक शस्त्रास्त्रांच्या बाबतींत झालेल्या करारांत चीन सामील नाहीं आणि तसा तो होण्याचीं लक्षणेंहि दिसत नाहींत. अण्वस्त्रांच्या स्फोटाबद्दल सर्वमान्य करार न झाल्यास नवीन नवीन देश ह्या शर्यतींत उतरतील आणि मग असा करार घडवून आणणें अधिकच बिकट होईल. चीन ह्या बाबतींत काय वर्तणूक ठेवील तें सांगणें कठीण आहे. परंतु अमेरिकेच्या अणुशक्ति मंडळाचे अध्यक्ष मि. सिबोर्ग ह्यांनीं चीनबद्दल दिलेला धोक्याचा इशारा डावलून चालणार नाहीं. ते म्हणतात कीं, अणुस्फोटकांच्या बाबतींत बेजबाबदारपणें वागून चीन त्याच्याशीं सहमत असणाऱ्या छोट्या देशांना अण्वस्त्रें पुरविण्याची शक्यता आहे. आज चीनजवळ फक्त स्फोटक बाँब आहे. तो वाहून इच्छित उद्दिष्टावर टाकण्याचीं साधनें नाहींत. परंतु येत्या पांच वर्षांच्या अवधींत चीन अग्निबाणांच्या साह्यानें अण्वस्त्रें सोडण्याचें तंत्र आत्मसात करील. शिवाय ह्या अवधींत चीनजवळ अण्वस्त्रांचा बराचसा सांठाहि होईल. त्यांतून इतर दोस्त राष्ट्रांना अणुबाँब पुरविणें चीनला शक्य होईल.

## " ब्लिट्झ " वरील दाव्यानें साधलेलें व्यापक हित

### न्यायमूर्ति तारकुंडे ह्यांचा महत्त्वपूर्ण निवाडा

सुप्रसिद्ध उद्योगपति, श्री. कृष्णराज ठाकरसी, ठाकरसी उद्योगसमूहाचे प्रमुख, ह्यांनीं ' ब्लिट्झ ' साप्ताहिकावर अब्रू-नुकसानीचा दावा लावला होता, त्यांत ते पूर्णपणें यशस्वी झाले आहेत. " ह्या दाव्यांतील बदनामीकारक लेख म्हणजे कंड्या पिकविण्याच्या वृत्तीचा निर्लज्ज नमुना आहे; म्हणून, सामाजिक कल्याणाच्या दृष्टीनें अशा तऱ्हेच्या प्रकाशनाला कोणत्याहि प्रकारचें हक्कसंरक्षण असतां कामा नये. केवळ सनसनाटी निर्माण करणें आणि बदनामीकारक कंड्या पिकविणें ह्यासाठी वृत्तपत्राचा उपयोग करण्याच्या मोहाला ह्या हुकमामुळे आळा बसेल " असे उद्गार मुंबई हायकोर्टाचे न्यायमूर्ति श्री. व्ही. एम. तारकुंडे ह्यांनीं काढले आहेत.

प्रस्तुत दाव्यांत श्री. कृष्णराज ठाकरसी ह्यांच्या चारित्र्याचा प्रश्न तर महत्त्वाचा होताच; पण त्याचबरोबर व्यापक महत्त्वहि ह्या दाव्याला आणि त्याच्या निर्णयाला आहे. स्वतःच्या कर्तृत्वानें यशस्वी उद्योगपति होणारांचे विरुद्ध भरमसाट खोटेनाटें लिहून, सामाजिक कल्याणाच्या नांवाखालीं स्वार्थ साधण्याचा एक पंथच निर्माण होत आहे, त्यामुळें समाजाला अत्यंत अनिष्ट वळण लागत आहे आणि त्याला वेळींच आळा बसणें आवश्यक आहे. उद्योगधंदे काढणें आणि चालविणें अत्यंत अवघड गोष्टी असतात. आपलें सर्वस्व पणास लावून संपत्तीचें उत्पादन करणारांना देशद्रोही ठरवूं पाहणें अत्यंत घातुक आहे; कारखानदारी हाच देशाच्या आर्थिक अभ्युदयाचा आणि संरक्षणाचा पाया आहे. अशा परिस्थितींत, सचोटीच्या उद्योगी लोकांना बेजबाबदार बदनामीला तोंड द्यावें लागावें, हा दुर्दैवाची गोष्ट आहे. श्री. कृष्णराज ठाकरसी ह्यांनीं प्रस्तुत दावा लावण्यांत जी तत्परता दर्शविली आणि त्याबाबत जो मनस्ताप सहन केला, त्याबद्दल उद्योगप्रेमी लोक त्यांचे ऋणीच राहतील. त्यांनीं केलेल्या राष्ट्रपुरुषाच्या ह्या सेवेबद्दल आम्हीं त्यांचें मनःपूर्वक अभिनंदन करतों.

श्री. कृष्णराज ठाकरसी ह्यांनीं मागितलेली सर्व भरपाई त्यांना हायकोर्टानें देवविली असून प्रतिवादींवर कडक ताशेरे झाडले आहेत. न्यायमूर्ति तारकुंडे म्हणतातः—

" या बदनामीकारक लेखांत वादींवर अत्यंत गंभीर आरोप करण्यांत आले आहेत. प्राप्तिकर टाळाटाळ, ५० बनावट कंपन्या स्थापणें, आयात परवाने मिळविणें, परदेशी चलनविषयक नियमांचा भंग, आर्थिक जादुगारी आणि प्रचंड प्रमाणावर अफरातफर, हे ते गंभीर आरोप होत.

" या आरोपांची सत्यता सिद्ध करणारा पुरावा या कोर्टांत सादर करण्यांत आलेला नाहीं. या खटल्यांतील टीकेला ' वाजवी टीका ' असें म्हणतां येणार नाहीं. वाजवी टीका ही गोष्ट येथें टिकत नाहीं; कारण सत्य स्थितीचें वर्णन आणि टीका असे दोन भाग या लेखांत पाहतां येण्यासारखी स्थिति नाहीं.

" आरोपांचें समर्थन होत नसल्यामुळें वाजवी टीकेचा मुद्दा आपोआप गळतो. पत्रकाराच्या मर्यादित हक्कासंबंधींचा ( क्वालिफाइड प्रिव्हिलेज ) मुद्दाहि याच प्रकारें लटका ठरतो. हा बदनामीकारक लेख उघड उघड भयंकर बेअब्रू करण्याच्या हेतूनें लिहिलेला असल्यामुळें सामाजिक हिताच्या दृष्टीनें अशा लेखनप्रकाराला कोणत्याहि प्रकारचें खास संरक्षण देण्याची कांहींहि शक्यता संभवत नाहीं. "

मुंबई हायकोर्टाच्या ओरिजिनल बाजूला चाललेला हा सर्वांत मोठा दावा होय. २४ जून १९६४ रोजीं खटल्यास प्रारंभ होऊन तो १२ फेब्रुवारी १९६५ रोजीं संपला. निवाडा सांगण्यासच १६ दिवस लागले; सतत ७५ तास न्यायमूर्ति निवाडा सांगत होते. राष्ट्रकुलांतील अब्रूनुकसानीच्या सर्व खटल्यांत हा खटला लांब ठरेल. प्रतिवादींनीं बोलाविलेल्या साक्षीदारांना उलट तपासणीवजा प्रश्न विचारण्याची प्रतिवादींना परवानगी देण्यांत आली, हेंहि ह्या खटल्याचें वैशिष्ट्य आहे. वादीला साक्षीसाठी उभें राहावें न लागतां त्याची नुकसानभरपाईची मागणी पूर्णतः मान्य करण्यांत आली, ही तर अपूर्व घटना समजली पाहिजे. प्रतिवादींवरील प्राथमिक जबाबदारी त्यांना पार पाडतां न आल्यामुळें वादीनें साक्षीस येण्याचें कारण नाहीं, असेंच न्यायमूर्तींनीं म्हटलें.

ह्या दाव्याच्या निकालाचें वाचन चालू असतांच, ४ फेब्रुवारी रोजीं, श्री. कृष्णराज ठाकरसी ह्यांच्या पत्नी सौ. पद्मा निवर्तल्या, हा दैवदुर्विलासच होय. श्री. कृष्णराज ह्यांचेवर हा आघात त्यांच्या नतिक विजयाच्या क्षणींच घडावा, ह्यानें दुर्दैवांत भरच घातली आहे.

---

**बिनहिशेबी पैशासाठी झडत्या योग्य**—मुंबईतील एक अर्थशास्त्रज्ञ श्री. घटालिआ ह्यांनीं बिनहिशेबी दडवलेल्या पैशासाठी सरकारनें योजलेल्या उपायांना पाठिंबा दिला आहे. त्यांच्या मतानें अशा प्रकारच्या काळ्या पैशाच्या रूपांत असलेल्या धनाची किंमत ३ हजार कोटी रुपये आहे. ह्या धनांत रोख रक्कम, चैनीच्या वस्तु, सोनें व इतर प्रकारची मालमत्ता, ह्यांचा समावेश आहे.

**नापास विद्यार्थ्यांचें मोठें प्रमाण**—विद्यापीठांच्या परीक्षाला बसणाऱ्या विद्यार्थ्यांत नापास होणाऱ्या विद्यार्थ्यांचें मोठें प्रमाण पाहून नियोजन समितीचे सभासद डॉ. व्ही. के. आर. व्ही. राव ह्यांनीं चिंता व्यक्त केली आहे. बी. ए., बी. कॉम्. आणि एस्. एस्. सी. ला बसणाऱ्या विद्यार्थ्यांपैकी ५० टक्क्यांपेक्षा अधिक जण नापास होतात, आणि जे पास होतात त्यांच्यापैकी आर्टसच्या व कॉमर्सच्या अभ्यासक्रमाचे ७० टक्के विद्यार्थी तिसऱ्या वर्गांत उत्तीर्ण होतात. शास्त्र विषयांच्या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांपैकी ४० टक्के तिसऱ्या वर्गांत पास होतात, असे आढळून आले आहे.

**पन्ना खाणींतील हिऱ्यांचा लिलाव**—मध्यप्रदेशांतील पन्ना येथील खाणींत सांपडलेल्या २,७०० हिऱ्यांचा नॅशनल मिनरल कॉर्पोरेशनतर्फे लिलाव करण्यांत आला. त्यांचें वजन सुमारें १,५७० कॅरेट्स होतें. कॉर्पोरेशननें गेल्या वर्षी अशा प्रकारच्या हिऱ्यांचा लिलाव प्रथमच केला होता. कॉर्पोरेशनची स्थापना ५ वर्षांपूर्वी झालेली आहे. लंडनमधील हिऱ्यांची लिलावानें विक्री करण्याची पद्धत सोडली तर जगांत भाराताशिवाय दुसऱ्या कोठेहि हिऱ्यांच्या विक्रीची पद्धत प्रचलित नाहीं.

**हिंदी एंजिनिअर्सना शिक्षण**—पांचव्या पंचवार्षिक कार्यक्रमांत उभारण्यांत यावयाचा एक पोलादाचा कारखाना सर्वस्वी भारताच्या एंजिनिअरांकडून उभारण्यांत येईल. त्यासाठी रांची, दुर्गापूर, भिलई आणि रूरकेला ह्या पोलादाच्या कारखान्यांतून हिंदी एंजिनिअरांना शिक्षण देण्यांत येत असून त्यांत समाधानकारक प्रगति होत आहे. एंजिनिअरांना शिक्षण देण्याच्या योजनेचा आणखी विस्तार करण्यांत येणार आहे. बोकारो येथें उभारावयाच्या चौथ्या पोलाद कारखान्यासंबंधींचा रशियाचा अहवाल सहा महिन्यांत हातीं येईल.

## फर्म्सचे बॉस कामें केव्हां व कशीं करतात ?

एका सुप्रसिद्ध तज्ज्ञानें फर्म्सचे बॉस आपलीं कामें केव्हां व कशीं करतात, ह्याविषयीं ब्रिटन, अमेरिका व युरोप येथें पाहणी करून आपले निष्कर्ष काढले आहेत.

रोजच्या कामाच्या वेळांत त्याला इतक्या वेळां व्यत्यय येतात, कीं कचेरी सुटल्यावर किंवा सुटीच्या दिवशींहि त्याला महत्त्वाचीं कामें करणें भाग पडतें.

बॉसेसवरचा कामाचा ताण वाढत आहे; मॅनेजरच्या जागीं काम करणारे लोकहि पूर्वीच्या मानानें लवकर मरण पावूं लागले आहेत. त्यांची सरासरी वयोमर्यादा आतां फक्त ५६ वर्षांची आहे.

दिवस कसा सरतो, हेंच त्यांना समजत नाहीं; दमून-थकून गेलेल्या बॉसलाहि 'पुरेसें काम झालें नाहीं' असेंच वाटतें.

१०० बॉसेसनीं आपल्या प्रत्येकी १,००० तासांच्या कामाचा तपशीलवार हिशेब ठेवला, तेव्हां त्यांनीं आपल्या हाताखालील खातेप्रमुखांपेक्षा आणि नोकरांपेक्षाहि जास्त वेळ काम केल्याचें आढळून आलें.

प्रत्येकानें कचेरींत दर आठवड्यास किमान ५२ तास काम केलें. येण्यापूर्वीं एक तास काम करणारे आणि घरीं जातांना वाटेंत फाइली वाचणारे त्यांत पुष्कळ होते.

ह्याखेरीज, सरासरीनें सव्वातीन तास, फर्मच्या धंद्याच्या दृष्टीनें, सामाजिक दळणवळणांत घालवावे लागले, ते वेगळेच. लंचचे दर आठवड्याचे साडेपांच तासहि कामाच्या तासांतच मोजावयाला हवेत.

सामान्यपणें, बॉसच्या कामाच्या वेळेचा विनियोग खालील-प्रमाणें होतो:—

१६$\frac{1}{2}$% वेळ पत्रव्यवहार
५% वेळ टेलिफोन
२५% वेळ स्टाफशीं चर्चा
११$\frac{1}{2}$% वेळ लंच
२२% वेळ पुढील धोरणांची आंखणी

बाकीचा वेळ वाचनांत, सभा घेण्यांत, कारखाने आणि माल ह्यांची पाहणी करण्यांत जातो.

बॉसला दररोज सरासरीनें ४० वेळां टेलिफोनचे कॉल येतात; ३० लोक भेटायला येतात. वर निर्दिष्ट केलेल्या १०० बॉसेसना १,००० तासांत ३,८६४ वेळां टेलिफोन कॉल्सनीं आणि ३,३०९ वेळां व्हिजिटर्सनीं व्यत्यय आणला. बहुतेकांना कचेरीच्या वेळांत कामावर लक्ष केंद्रित करतांच येत नाहीं. कचेरीची वेळ संपून ती रिकामी झाल्यावर केलेल्या एक तास कामाची बरोबरी कचेरीच्या वेळांतील तीन तासांच्या कामानेंहि होणार नाहीं.

कित्येक बॉस, जें काम खालच्या लोकांनीं करायला हरकत नाहीं, तें स्वतःच करीत बसतात; कांहीं बॉस जें काम तज्ज्ञाकडे सोपवायला हवें, त्यांत डोकें खुपसून वेळ वायां घालवतात. हुकूम देण्यांतील संदिग्धतेमुळें पुष्कळांचा स्वतःचाच वेळ वायां जातो; कारण, हाताखालचे लोक वरचेवर विचारायला येत राहतात.

बॉसचें काम हलकें करण्याचा एकच मार्ग आहे, तो म्हणजे बॉस सहजीं उपलब्ध होऊं नये अशीच व्यवस्था केली पाहिजे. तो कचेरींत असला, तरी "बाहेर" ची पाटीच त्याच्या दरवाजावर लावण्याची प्रथा त्यामुळें वाढत आहे.

कांहीं बॉसेसनीं आपल्या कचेऱ्यांत खास खोल्या बांधून घेतल्या आहेत. महत्त्वाचें काम करायचें असलें, म्हणजे बॉसेस त्यांत जाऊन बसतात. कचेरीला आग लागली, तरच त्यांना खबर देण्यासाठी तेथें जायला स्टाफला परवानगी आहे; एरवीं नाहीं !

## परदेशपर्यटन करणाऱ्या अमेरिकनांवर कर !

प्रवासाची सुलभ आणि गतिमान् साधनें नव्हतीं तेव्हां जगाचें पर्यटन करणें ही साहसाची गोष्ट समजली जात असे. अशा काळांत लिहिल्या गेलेल्या प्रवासवर्णनांमुळें जगाच्या वाङ्मयांत मोलाची भर पडलेली आहे. आतां मात्र असे ग्रंथ निर्माण होण्याची शक्यता कमी. कारण, विमानांतून प्रवास करणाऱ्या आधुनिक हौशी प्रवाशांना अल्प काळांत कोठल्याहि देशाची नीटशी माहिती होणेंच अशक्य असतें. परंतु ह्या आधुनिक प्रवाशांमुळें—त्यांतहि अमेरिकेसारख्या प्रगत देशांतून येणाऱ्या प्रवाशांमुळें—भारतासारख्या मागासलेल्या देशांना दुर्लभ डॉलर्सची प्राप्ति होते. अलीकडे भारतांत येणाऱ्या परदेशीय प्रवाशांची संख्या सालोसाल वाढत चालली आहे. ह्या वाढींतहि अमेरिकन प्रवाशांचा भरणाच अधिक असतो. आतां अशी वार्ता आहे कीं, अमेरिकन सरकार परदेशपर्यटनास जाणाऱ्या प्रत्येक प्रवाशावर १०० डॉलर्स कर घेण्यास प्रारंभ करणार आहे. अमेरिकेंतून बाहेर जाणाऱ्या डॉलर्सच्या प्रवाहाबद्दल अमेरिकन सरकारला चिंता वाटत आहे. परदेशांशी असलेल्या देण्याघेण्याच्या व्यवहारांत गेल्या सालीं अमेरिकेला १०७ कोटी डॉलर्सच्या प्रतिकूल फरकाला तोंड द्यावे लागलें. परदेशपर्यटनोत्सुक लोकांवर कर बसवून बाहेर जाणाऱ्या डॉलर्सना कांहीं प्रमाणांत अडविण्याचा सरकारचा हेतु आहे. परंतु, हा उद्देश कितपत साध्य होईल हे सांगतां येणार नाहीं. कांहीं प्रमाणांत तो साध्य झाला तरी देण्याघेण्याच्या व्यवहारांतील प्रतिकूल तफावत भरून काढण्यास त्यामुळें फारशी मदत होणार नाहीं. कारण, डॉलर्सचा ओघ अमेरिकेंतून बाहेर जाण्यास इतर फार मोठ्या वाटा आहेत. अमेरिका युरोपमध्यें व इतरत्र भांडवल गुंतवीत आहे, परदेशांतील आपल्या लष्करी तळावर खर्च करीत आहे आणि परदेशांना मदतहि करीत आहे. ह्या मार्गांनीं परदेशांत जाणारे कोट्यवधी डॉलर्स आहेत. परदेश पर्यटनास जाणाऱ्या लोकांवर कर बसल्यानें मागासलेल्या देशांचे डॉलर्स मिळविण्याचें एक साधन मात्र नाहींसें होणार आहे.

## तलावांतील पाण्याचे सांठे

महाराष्ट्र राज्यांतील इरिगेशन खात्याकडे असणाऱ्या तलावां-तील पाण्याचे सांठे दि. १–२–१९६५ अखेर पुढीलप्रमाणें होते.

| क्रं. | तलावाचें नांव | पूर्ण भरल्यावरचा सांठा दशलक्ष घनफूट | गतवर्षी याच दिवशीचा सांठा दशलक्ष घनफूट | आजचा सांठा दशलक्ष घनफूट |
|---|---|---|---|---|
| (१) | भाटघर तलाव | २४११८ | १५३६७ | १६५७७ |
| (२) | भंडारदरा तलाव | ११९८८ | ५३२५ | ६०८५ |
| (३) | विसापूर तलाव | १५१० | ७० | ५३२ |
| (४) | दारणा तलाव | ७७६३ | ४६२७ | ५६०४ |
| (५) | चंकापूर तलाव | १५४८ | ८५९ | ८६१ |

## कृष्णवर्णीय स्त्रियांवर सरसकट संततीप्रतिबंधक शस्त्रक्रिया करण्याची सूचना

डॉ. घनीप्रेम, बार्मिंगहॅम इंडिअन असोसिएशनचे अध्यक्ष, ह्यांनीं तेथील कृष्णवर्णीय पत्नींवर सरसकट शस्त्रक्रिया करण्यांत याव्यात असें सुचविलें आहे. ह्या असोसिएशनचे १०,००० सभासद आहेत. स्थाइक होणाऱ्या हिंदी लोकांच्या पत्नी संततिनियमनाची साधनें वापरण्यास उत्सुक नसतात, तेव्हां ग्रेटब्रिटनमधील शहरें कृष्णवर्णीयांच्या गर्दीनें भरून न जाण्यास हाच एक उपाय आहे, असें डॉक्टरसाहेबांचें म्हणणें आहे.

### छोट्या मोटारींच्या उत्पादनासाठी सहकार्य

भारतांत छोट्या मोटारींचें उत्पादन करण्यासाठी परदेशांकडून साह्य मिळविण्याचे प्रयत्न करण्यांत येत आहेत. भारताचे उद्योगमंत्री श्री. सिंग आणि झेकोस्लोव्हाकिआचे भारी एंजिनिअरिंग खात्याचे मंत्री ह्यांच्या दरम्यान ह्याविषयीं चर्चा करण्यांत आली. ह्या वाटाघाटींना अद्याप नीटसें स्वरूप आलेलें नाहीं; कारण छोट्या मोटारींचें उत्पादन करावयाचें कीं नाहीं ह्याबद्दलच सरकारनें अद्याप निर्णय घेतलेला नाहीं. तथापि असा कारखाना काढण्याचें ठरल्यास झेकोस्लोव्हाकिआमधील सुप्रसिद्ध स्कोडा कारखान्यानें त्यांत सहभागी होण्याची इच्छा दर्शविली आहे. भारत सरकार छोट्या मोटारींचा कारखाना काढण्याविषयीं फ्रान्स, पश्चिम जर्मनी आणि जपान ह्या देशांतील उद्योगपतींशींहि विचारविनिमय करीत आहे.

### रशिआंतील भांडवल-गुंतवणुकींत बदल

रशिआंतील नव्या पुढाऱ्यांनीं अर्थव्यवस्थेंतील भांडवल गुंतवणुकीच्या कार्यक्रमांत बदल केला आहे. माजी पंतप्रधान क्रुश्चेव्ह अधिकारारूढ असतांना त्यांनीं रासायनिक उद्योगधंद्यांच्या विकासाला गुंतवणुकीच्या बाबतींत प्राधान्य दिलें होतें. नव्या सरकारनें खनिज धातूंविषयक उद्योगधंद्यांतील गुंतवणुकीस पुन्हा महत्त्व दिलें आहे. १९६४ च्या मानानें चालू वर्षीं रासायनिक उद्योगधंद्यांत १२ टक्के अधिक गुंतवणूक होईल. १९६२ सालांतील योजनेप्रमाणें ही गुंतवणूक ३६ टक्क्यांनीं वाढणार होती. अलीकडे बऱ्याच उद्योगधंद्यांत पर्यायी वस्तु वापरण्यांत येऊं लागल्या तरी अजून कित्येक वर्षें यंत्रांची निर्मिति, बांधकाम आणि इतर अनेक उद्योगधंदे ह्यांमध्यें लोखंड व पोलादच मोठ्या प्रमाणावर वापरलें जाण्याची शक्यता आहे असें नव्या सत्ताधाऱ्यांचें मत आहे.

### दरमाणशीं उत्पन्नांत दिल्लीचा क्रमांक पहिला

व्यावहारिक आर्थिक संशोधनमंडळातर्फे भारतांतील दरमाणशीं उत्पन्नासंबंधीं पाहणी करण्यांत आली आहे. पाहणींतील माहितीवरून असें आढळून आलें आहे कीं, दिल्लीमधील दरमाणशीं उत्पन्न सर्वांत अधिक म्हणजे ८७१·६० रुपये आहे. दिल्लीमध्यें नोकरीपेशाचे लोक मोठ्या प्रमाणावर असल्यानें दरमाणशीं उत्पन्न अधिक आहे असा निष्कर्ष काढण्यांत आला आहे. राष्ट्रीय उत्पन्नाच्या राज्यवार वांटणीसंबंधानें मंडळानें केलेल्या अहवालांत दिल्लीच्या खालोखाल दरमाणशीं उत्पन्नाच्या बाबतींत महाराष्ट्राचा अनुक्रम लावला आहे. महाराष्ट्रांतील दरमाणशीं उत्पन्न ४६८·५० रुपये आहे. त्यानंतर पश्चिम बंगालचा अनुक्रम आहे. तेथील उत्पन्न ४६४·६० रुपये आहे. बिहारमधील दरमाणशीं उत्पन्न सर्वांत कमी म्हणजे २२०·७० रुपये आहे.

### सोडतीचीं बनावट तिकिटें विकून फसवणूक

लष्कराच्या हितासाठी स्त्रियांच्या नांवानें काढण्यांत आलेल्या एका बिनबुडाच्या संघटनेनें सोडतीचीं खोटीं तिकिटें विकून कित्येक लोकांना हजारों रुपयांना ठकविल्याचा प्रकार दिल्लीस उघडकीस आला आहे. ह्या बनावट तिकिटांतील 'सुदेवी' तिकिटांची २६ जानेवारी रोजीं चिठ्ठ्या टाकून निवड करण्यांत यावयाची होती. तिकिटें १ रुपयांचीं होतीं आणि लष्करांतील अधिकारी, संरक्षण खात्यांतील नोकर, विद्यार्थी, शिक्षक, इत्यादींनीं तीं हजारोंच्या संख्येनें घेतलीं होतीं. बक्षिसांच्या वस्तूंत मोटारी, जीप्स, मोटार सायकली, स्कूटर्स, रेडिओ, ट्रॅन्झिस्टर सेट्स्, मोठीं कपाटें, शिवणाचीं यंत्रें, घड्याळें, विजेचे पंखे, इत्यादि वस्तु होत्या. संरक्षण खात्यानें तक्रार केल्यावर पोलिसांनीं ह्या ठगांच्या टोळीचा शोध चालू केला व त्याची वार्ता देशभर जाहीर केली.


**वैश्य को-ऑपरेटिव्ह बँक लि.**

स्थापना : १९४५ ] मुगभाट, मुंबई-४. [ टेलिफोन ७२१००

**बचतीच्या आकर्षक योजना**

| | |
|---|---|
| ( १ ) स्पेशल सेव्हिंग | व्याजाचा दर ३॥ टक्के |
| ( २ ) त्रैवार्षिक मासिक बचत | „ ३। „ |
| ( ३ ) पंचवार्षिक बचत सर्टिफिकिटें | „ ५ „ |

*मुदतीच्या आकर्षक दरासंबंधीं चौकशी करा.*

मॅनेजर—ना. शं. कानिटकर




**बेडेकर**

मसाले, लोणचीं व पापड

आपल्या जेवणांत विशेष लज्जत आणतील.


वापरून पाहा.

मुगभाट, मुंबई ४.

शाखाः ठाकुरद्वार, दादर, कोट व परळ.

BUT FOR KEY APPLICATION TO MACHINES

Make doubly sure by fitting



GADRE BANDHU

MADHAVNAGAR (S.R.)

INDIA

MANUFACTURERS OF MACHINE SPARE PARTS & TOOLS

### बोकॅरो कारखान्यासाठी मिळावयाची मदत

बोकॅरो येथें उभारण्यांत यावयाच्या चौथ्या पोलादाच्या कारखान्यासाठीं रशिआकडून मिळावयाच्या मदतीबद्दलची बोलणीं आतां अखेरच्या टप्प्यावर येऊन पोंचलीं आहेत. रशिआकडून मिळणाऱ्या आर्थिक मदतीबद्दल कोठलीहि अडचण आलेली नाहीं. कारखान्यासाठीं मिळणाऱ्या कर्जावरील व्याजाचा दर आणि त्याची परतफेड ह्यासंबंधींच्या अटी भिलाई येथील कारखान्याबाबत झालेल्या करारांतील अटींप्रमाणेंच असतील. कारखान्याच्या उभारणीबाबत भारत व रशिआ ह्यांच्या दरम्यान लवकरच करार होईल अशीं लक्षणें दिसत आहेत. दरम्यान कारखान्याच्या जागेवर प्राथमिक स्वरूपाच्या कामाला जोरानें प्रारंभ करण्यांत आला आहे. कामासाठीं लागणाऱ्या अवजड यंत्रसामग्रीच्या मागण्या नोंदविण्यांत आल्या आहेत.

---

### मद्रासमधील झडत्यांत ६० लाखांचें भूमिगत धन

मध्यवर्ती गुप्त माहितीखात्याच्या मद्रास शाखेला शहरांतील कांहीं कापड व्यापाऱ्यांनीं दडवून ठेवलेल्या पैशाविषयीं माहिती मिळाली. सदर माहितीचा उपयोग करून आर्थिक गुन्हा विभागातर्फे शाखेनें ८ प्रमुख व्यापाऱ्यांची झडती घेतली. ह्या व्यापाऱ्यांच्या राहण्याच्या जागा व त्यांच्या धंद्याच्या कचेऱ्या मिळून ११ ठिकाणीं अकस्मात् धाडी घालण्यांत आल्या. ह्या झडत्यांच्या सत्रांत ६० लाख रुपयांची रोकड, १ लाख रुपयांपेक्षा अधिक किंमतीचें सोनें आणि जडजवाहिर हस्तगत करण्यांत आलें. त्याशिवाय सीलबंद केलेली एक तिजोरीहि आढळून आली. ह्या व्यापाऱ्यांवर निर्यात नियंत्रणाचा भंग करणें, प्राप्तिकर चुकविणें, बनावट हुंड्यांचे व्यवहार करणें, इत्यादि आरोप ठेवण्यांत आले आहेत. व्यापाऱ्यांनीं चुकविलेल्या प्राप्तिकराची रक्कम ५० लाखांच्या घरांत आहे.

### मोठ्या शहरांतील दीनवाणे लोक

भारतामधील मोठ्या शहरांतून राहणाऱ्या लोकांपैकीं ३५ टक्के लोकांनाच पुरेसा अगर जेमतेम गरजेपुरता पाणीपुरवठा होत आहे आणि सांडपाण्याचा निचरा करण्याची योग्य व्यवस्था तर ५ ते ६ टक्के लोकांच्याच वांटणीला येते. ५ लाखांपेक्षा जास्त लोकवस्ती असलेल्या मोठ्या शहरांतील ३० टक्क्यांपेक्षा अधिक लोक अमंगल व अस्वच्छ वस्त्यांतून राहात असतात. शहरांत राहणाऱ्या कुटुंबांपैकीं ४४ टक्के कुटुंबें आणि ग्रामीण मार्गांतील ३४ टक्के कुटुंबें एका खोलीच्या बिऱ्हाडांत जीवन कंठीत असतात. १ लाखावर वस्ती असलेल्या वीस शहरांतून २५ ते ४५ टक्के बिऱ्हाडांतूनच पाण्याची स्वतंत्र व्यवस्था आहे, आणि ३० टक्के कुटुंबांनाच संडासाची स्वतंत्र सोय असते. कलकत्यांतील कांहीं मार्गांतून तर ५० माणसांमागें एक संडास आहे. मोठ्या शहरांतील वस्ती अफाट वाढल्याचे हे परिणाम आहेत.

---

### निजामाकडून यावयाची कराची बाकी

हैद्राबाद संस्थान भारतीय संघराज्यांत विलीन करण्यांत आलें. करारांतील शर्तीप्रमाणें हैद्राबाद कॉर्पोरेशनला निजामाच्या मालमत्तेवर कर घेण्याचा अधिकार नाहीं असें त्याचे म्हणणें आहे. कॉर्पोरेशनला हें मत मान्य नाहीं. कॉर्पोरेशनच्या मतानें मालमत्तेवरील कराचे प्रीत्यर्थ निजामाकडून ४० लाख रुपये येणें आहे. ह्या बाबतींत कॉर्पोरेशनचा भारत सरकारशीं पत्रव्यवहार चालू आहे. निजामानें लावलेला सामीलनाम्यांतील अटींचा अर्थ बरोबर असेल तर कॉर्पोरेशनचें होणारें ४० लाख रुपयांचें नुकसान भारत सरकारनें भरून द्यावें अशी मागणी करण्यांत येत आहे. हैद्राबाद शहरांत निजामाच्या अनेक भव्य इमारती व बागा आहेत. त्याच्या मालकीचा एकच विलासी राजवाडा ५० लाख रुपयांचा आहे. त्याचें सध्यांचें वास्तव्य स्थानहि प्रासादतुल्य आहे.

---

### कम्युनिस्ट अर्थव्यवस्था अशी नाहींच

दिल्ली येथें भरलेल्या आंतरराष्ट्रीय चेंबर ऑफ कॉमर्सच्या सर्वसाधारण अधिवेशनांत बोलतांना अमेरिकन प्रतिनिधि मंडळाचे पुढारी मि. ऑर्थर वॅटसन म्हणाले कीं, सोव्हिएट रशिआंत प्रचलित असलेल्या सध्यांच्या अर्थव्यवस्थेला इतिहास काय नांव देईल तें देवो. पण कांहींहि नांव दिलें तरी तें 'कम्युनिस्ट अर्थव्यवस्था' असें असणें शक्य नाहीं. रशिआंतील अर्थव्यवस्थेंत नफ्याला स्थान आहे; त्याचा उलगडा कसा करावयाचा? व्याज देण्याघेण्यास व खाजगी मालकीची घरें बांधण्यास देण्यांत येणारें उत्तेजन व पद्धत ह्यांचाहि बोध होत नाहीं. मि. ऑर्थर वॅटसन हे फक्त खाजगी व्यवसायाचे भोक्ते आहेत. पुढाकार घेण्याची वृत्ति आणि धंद्यांतील साहस ह्यांच्याबद्दल त्यांना फार कौतुक आहे.

---

### "गुंतवणूक करण्यासाठी भारत आमंत्रण करीत आहे"

वरील शीर्षकाची एक आकर्षक पुस्तिका बँक ऑफ इंडियानें प्रसिद्ध केली आहे. भारताचें विहंगम दर्शन घडवून परदेशी गुंतवणुकीस येथें किती मोठा वाव आहे, हें त्यांत दिग्दर्शित केलें आहे. पुस्तिकेंत माहिती व आंकडे भरपूर असून परदेशी अर्थशास्त्रज्ञ, राजकीय पुढारी आणि उद्योगपति ह्यांचीं मतें दिलीं आहेत; सरकारी आश्वासनांचें दिग्दर्शन केलें आहे आणि भारतानें स्वातंत्र्योत्तर केलेल्या प्रगतीची कल्पना आणून दिली आहे. परदेशी भांडवलदाराला गुंतवणुकीस सहायकारक अशी मदत देणाऱ्या संघटना, त्याचप्रमाणें करांत देऊं केलेल्या सवलती, ह्यांचाहि तपशील पुस्तिकेंत आहे. परदेशांतील आपल्या १४ शाखा आणि १,००० प्रतिनिधि ह्यांचे द्वारां बँक ऑफ इंडिया प्रस्तुत पुस्तिकेचा परदेशांतून प्रसार करणार आहे.

### नाशिक-देवळाली मार्गांतील वीजपुरवठा

नाशिक-देवळाली विभागांतील वीजपुरवठा १ मार्चपासून महाराष्ट्र इलेक्ट्रिसिटी बोर्ड नाशिक-देवळाली इलेक्ट्रिक सप्लाय कंपनी लि. कडून आपल्याकडे घेणार आहे.


ज्याच्या स्मृतीप्रीत्यर्थ रणजी करंडक सामने खेळले जातात, त्या क्रिकेट सम्राटाचे चरित्र

अलौकिक क्रिकेटपटु

रणजी

: लेखक :
वसंत रायजी

: अनुवादक :
श्री. वा. काळे

व्हीनस प्रकाशनतर्फे लवकरच प्रसिद्ध होईल.

**बिगरपरवाना रेडिओ सेटस्**—भारत सरकारच्या प्रत्यक्ष अमलाखालीं असलेल्या दिल्ली प्रदेशांत पोस्ट खात्यानें बिगर-परवाना वापरण्यांत येणाऱ्या रेडिओसाठी तपासणी केली असता असे ५,५०० रेडिओ सेटस् आढळून आले. ह्या रेडिओच्या मालकां-कडून जादा फी म्हणून ७४ हजार रुपये वसूल करण्यांत आले. १९६४ सालीं दिल्ली भागांतील रेडिओ वापरणारांकडून नेहमींच्या फीच्या रूपानें ३२ लाख रुपये वसूल झाले. त्यामागील वर्षापेक्षा ही रक्कम ३५ टक्क्यानें अधिक आहे.

**ऑस्ट्रेलिआंतूनहि गव्हाची आयात**—भारत ऑस्ट्रेलिआ-कडून १ लाख, २५ हजार टन गहूं आयात करणार आहे. त्या-साठी ३५ लाख ऑस्ट्रेलिअन पौंड किंमत द्यावी लागेल. त्यापैकीं १० टक्के रोखीनें द्यावयाची आहे; २० टक्के सहा महिन्यांत, आणखी २० टक्के ९ महिन्यांत आणि उरलेली ५० टक्के बारा महिन्यांत द्यावयाची आहे. विक्रीच्या हप्त्यावर व्याजहि द्यावें लागेल.

**अमेरिकन बँकेची मदत**—वाराणसी येथील रेल्वे एंजिनांच्या कारखान्याला मदत म्हणून अमेरिकेच्या एक्सपोर्ट-इंपोर्ट बँकेनें १·७ कोटी डॉलर्सचें कर्ज मंजूर केलें आहे. कारखान्याला बँके-कडून मिळालेलें हें दुसरें कर्ज आहे. डिझेल तेलावर चालणाऱ्या रेल्वे एंजिनांसाठी जे भाग अमेरिकेंतून आयात करावे लागतील त्यांच्यासाठी होणारा परदेशीय चलनांतील खर्च ह्या कर्जातून करण्यांत येणार आहे.

**सिगारेटसच्या जाहिरातींवरील बंदी**—व्यापारी तत्त्वावर चालविण्यांत येणाऱ्या टेलिव्हिजनच्या कार्यक्रमांत सिगारेटसच्या जाहिरातींना बंदी घालण्याचा विचार ब्रिटिश सरकार करीत आहे. १९६३ च्या पहिल्या नऊ महिन्यांत फुफुसाच्या कॅन्सरने जितके बळी घेतले, त्यापेक्षा ५ टक्के अधिक बळी १९६४ च्या पहिल्या ९ महिन्यांत घेतलेले आढळून आले. त्यामुळें ब्रिटनच्या आरोग्य मंत्र्यांनीं हा बंदीचा निर्णय घेण्याचें ठरविलें आहे.

**कोकोच्या बियांचा नाश**—कोकोच्या बियांचें उत्पादन करणाऱ्या देशांच्या संघटनेनें कोकोच्या किंमती घसरण्याच्या भीतीनें कांहीं प्रमाणांत त्यांचा नाश करण्याचा निर्णय घेतला होता. ह्या निर्णयाला अनुसरून घाणा देशाच्या मार्केटिंग बोर्डानें आपल्या उत्पादनापैकीं २ टक्के पिकाचा नाश करावयाचा आहे. त्यापैकीं ५०० टन कोकोच्या बिया अग्नीच्या भक्ष्यस्थानीं लोटण्यांत आल्या. घाणा, नायजेरिआ, ब्राझील, इत्यादि देश ह्या निर्णयांत सामील आहेत.

**कायदा सोपा करण्याचा प्रयत्न**—ब्रिटनच्या मजूर सर-कारनें कायद्यांचें संहितीकरण करून ते सामान्य माणसाला समजतील अशा भाषेंत ग्रथित करण्याचें ठरविलें आहे. ह्या कामासाठी दोन मंडळें नेमण्यांत आलीं आहेत; एक मंडळ इंग्लंड-वेल्ससाठी व दुसरें स्कॉटलंडसाठी. ब्रिटनमधील कांहीं कायदे सन १२३५ पासूनचे असून त्यांची भाषा प्राचीन इंग्रजी म्हणूनच गणली जाते.


प्रगतिचे ३० वें वर्ष



हे लक्ष्मीचे नवदेवालय
इथे श्रमांचा सुफलित संचय
उद्योगाचे उगमस्थान हे
सौख्याचे संचित !
इथे हो सर्वांचे स्वागत!

बँक ऑफ महाराष्ट्र लि.
तुमची जिव्हाळ्याची बँक
आपल्या ९४ शाखांनिशीं तुमच्या सेवेस सिद्ध

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## सिमेंट एवढें महाग आणि दुर्मीळ कां ?

पन्नास वर्षांपूर्वी सबंध भारतांत सिमेंटचें उत्पादन करणारा एकच कारखाना होता, तो म्हणजे पोरबंदर ( गुजरात ) येथील इंडियन सिमेंट कं. लि. चा. त्याची उत्पादनशक्ति १,००० टनांची होती. त्यानंतर ह्या धंद्यानें खूपच प्रगति केली. विशेषत: १९४९ ते १९६४ ह्या काळांत उत्पादन विशेष वाढलें; २० लक्ष टनांचें तें १०० लक्ष टनांवर गेलें. कामगार × दिवस ह्या मापानें उत्पादन तिपटीपेक्षा वाढलें आहे. यांत्रिकीकरणामुळें उत्पादनक्षमता सुधारली आहे. इतकें उत्पादन होत असूनहि, ह्या धंद्यांतील गुंतवणूक हवी त्या मानानें वाढत नाहीं. कारण, सिमेंटची नियंत्रित विक्रीची किंमत गुंतलेल्या भांडवलावर पुरेसें व्याज सुटण्याइतकी नाहीं. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत १६० लक्ष टनांचें लक्ष्य ठरविलेलें होतें, तें तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत उतरवून १५० लक्ष टनांवर आणावें लागलें; हेंहि लक्ष्य गांठलें जाण्याची शक्यता नाहीं.

सिमेंटच्या किंमतींत वाढ करून दिली नाहीं, तर तुटवड्याची परिस्थिति टिकूनच राहील; कारण उत्पादनवाढीला आवश्यक तें आकर्षण कारखानदारांना उरणार नाहीं.

ह्या धंद्याचीं पहिलीं २५ वर्षें अडचणींतच गेलीं. १९२४ सालीं संरक्षक जकातींची मागणी करण्यांत आली पण ती नाकारली गेली. १९३६ सालीं दहा कारखाने असोसिएटेड सिमेंट कंपनीज लिमिटेड ह्या नांवाखालीं एकत्रित आले. डालमिया—जैन गटानें त्यांत आपल्या पांच कारखान्यांनिशी प्रवेश केला; इतरहि कारखाने सामील झाले. आतां, खाजगी क्षेत्रांत २० सिमेंट कंपन्यांचे ३४ कारखाने चालू आहेत. म्हैसूर, उत्तरप्रदेश, जम्मू आणि काश्मीर, ह्या राज्यांच्या मालकीचा प्रत्येकी एक सिमेंट कारखाना आहे. कांहीं सिमेंट कारखानदार इतरहि मालाचें मोठ्या प्रमाणावर उत्पादन करतात.

उत्पादनाच्या मानानें मोठ्या भांडवली गुंतवणुकीची आवश्यकता असणारा हा धंदा आहे. सोळा कंपन्यांचा विचार केला असतां, त्यांत गुंतलेलें ग्रॉस ब्लॉक भांडवल ९८.६ कोटी रु. तर त्यांची विक्री फक्त ७२.४ कोटी रुपयांची दिसून येते. ह्या धंद्यांत वसूल भांडवलाच्या मानानें गंगाजळींत टाकलेली रक्कम अल्प आहे; ह्याचें कारण नफ्याचें प्रमाणच इतर प्रकारच्या कारखान्यांचे मानानें कमी आहे. गंगाजळीचें वसूल भांडवलाशीं प्रमाण येथें ४०% आहे; जपानमध्यें तें १००% तर ग्रेटब्रिटनमध्यें ६५०% आहे. स्वत:च्या मालकीच्या भांडवलाच्या मानानें घेतलेल्या कर्जाची रक्कम वाढत चालली आहे. १९३७ ते १९६२ ह्या मुदतींत मालकीचें भांडवल ८.५ कोटी रु. चें ५९.७ कोटी रुपये झालें; म्हणजे तें ७ पटींनीं वाढलें. ह्या उलट, कर्जांची रक्कम १० लक्ष रुपयांवरून २३.२० कोटी रु. झाली.

**कांहीं प्रमुख धंद्यांतील गुंतवणुकीवर सुटणारें व्याज**

| | १९५८ | १९६० | १९६२ |
|---|---|---|---|
| कॉटन टेक्स्टाईल्स | ०.३ | १३.५ | ५.८ |
| लोखंड-पोलाद | ११.९ | १०.४ | १२.८ |
| इंजिनिअरिंग | ९.३ | १३.५ | १०.४ |
| सिमेंट | ५.३ | ७.८ | ९.४ |
| साखर | ८.३ | ११.२ | ३.५ |
| कागद | १०.७ | ९.९ | ७.१ |
| रसायन | ६.६ | १३.१ | ११.४ |
| आगपेट्या | ९.५ | १२.५ | १३.४ |
| एकूण ( इतर धरून ) | ७.१ | १०.९ | ९.० |

हिंदी सिमेंट कारखान्यांचें उत्पादन वाढलें असलें तरी अमेरिका, बेल्जम, जपान, ग्रेटब्रिटन, ह्या प्रमुख उत्पादक देशांच्या मानानें तें अत्यल्प आहे. एक टन सिमेंट उत्पादन करण्यास इतर देशांत १ ते १.२५ कामगार × तास लागतात, तर भारतांत १३ कामगार × तास लागतात. उत्पादनक्षमता वाढली म्हणजे नवे वाढावे निर्माण होतात आणि त्यांतून गिऱ्हाईक, कामगार, भागधारक, व्यवस्थापक आणि समाज सर्वांचाच फायदा होतो. भारतांत, उत्पादनक्षमता वाढल्यामुळें गिऱ्हाइकांचा फायदा होण्याऐवजी सरकारच दरसाल २५ कोटी रु. एक्साइज ड्यूटीच्या स्वरूपांत आणि ४.७४ कोटी रु. सिमेंट कंपन्यांवरील इन्कम टॅक्सच्या स्वरूपांत उचलीत आहे; गिऱ्हाइकांना विक्रीवरील कर द्यावा लागतो, तो वेगळाच.

---

**मुलांसाठी शेतीशाळा**—४ थ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत मुलांना शेतीचें शिक्षण देण्यासाठी २ हजार शेती शाळा काढण्याच्या एका योजनेला भारत सरकारच्या शिक्षणखात्यानें संमति दिली आहे. शाळांत शेतीचें तात्त्विक व व्यावहारिक शिक्षण देण्यांत यावयाचें आहे. ४ थ्या कार्यक्रमांत शेतीच्या उत्पादनाच्या वाढीवर जोर देण्याच्या दृष्टीनें ह्या शाळा काढण्यांत येणार आहेत.

**शेतमजुराला किमान वेतन**—मध्यवर्ती सरकारचे मजूरमंत्री श्री. संजीवय्या ह्यांनीं खात्यामार्फत राज्यसरकारांना, शेतमजुरांना दररोज किमान १ रुपया रोजगार देण्यांत यावा अशी सूचना केली आहे. कांहीं राज्यांतून किमान वेतन फारच कमी ठरविण्यांत आलेलें आहे. एका राज्यांत तर ते ६० पैसेच आहे. कांहीं राज्यांनीं सर्व राज्यभर मजुरीचे किमान दर ठरविले आहेत, तर कांहींनीं कांहीं विभागापुरतेच ते निश्चित केले आहेत.

**परदेशांना देण्यात येणाऱ्या कर्जांवर कर**—परदेशांना देण्यांत येणाऱ्या कर्जांच्या रकमेवर २ टक्के कर घेण्याचा हुकूम अमेरिकेचे अध्यक्ष जॉन्सन ह्यांनीं काढला आहे. जीं कर्जें एका वर्षापेक्षा अधिक मुदतीचीं असतील आणि जीं विकास पावलेल्या देशांना देण्यांत येतील, त्यांच्यावर हा कर घेण्यांत येणार नाहीं.

**भारत—मदत मंडळाची बैठक**—भारत—मदत—मंडळांतील देशांच्या प्रतिनिधींची बैठक पॅरिस शहरांत मार्च महिन्याच्या १६ व १७ तारखेस भरविण्यांत येणार आहे. भारताच्या तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांतील अखेरच्या वर्षांत परदेशीय चलनाची भारताची गरज किती आहे त्याचा विचार बैठकींत करण्यांत येणार आहे.

**गुजरात राज्यांतील दडवलेला पैसा**—गेल्या तीन महिन्यांत प्राप्तिकर खात्यानें गुजरात राज्यांत घातलेल्या धाडींमुळें ३८ लाख रुपयांचा बिनहिशेबी काळा पैसा उजेडांत आला आहे. खात्यातर्फे २३ झडत्या घेण्यांत आल्या आणि चलनी नोटा, जडजवाहिर, इत्यादि पकडण्यांत आलें. झडत्या झाल्यानंतर ४४ लोकांनीं स्वत:च्याजवळ असलेल्या काळ्या पैशांची आपण होऊन कबुली दिली. त्यांत एक भजी विकणारा होता. त्याच्याजवळ ६० हजार रुपये होते. त्यापैकी ६ हजार रुपये करापायीं जमा करण्यांत आले व बाकीची रक्कम परत करण्यांत आली.

**दक्षिण रेल्वेवरील भोजनाचे दर**—दक्षिण रेल्वेच्या उपाहार गृहांत वाढण्यांत येणाऱ्या जेवणाचे दर थोडे वाढविण्यांत येणार आहेत. अन्नपदार्थांच्या किंमतींत झालेल्या वाढीचा हा परिणाम आहे.

## परदेशी प्रवाशांच्या सोयींसाठी दोन कॉर्पोरेशन्स


भारतांत येणाऱ्या परदेशी प्रवाशांच्या सुखसोयींकडे लक्ष देण्यासाठी दोन नव्या कॉर्पोरेशन्सची स्थापना करण्यांत आली आहे. ही कॉर्पोरेशन्स सार्वजनिक मालकीच्या विभागांत उभारण्यांत आली आहेत. ह्या संबंधी बोलतांना भारत सरकारचे वाहतूकमंत्री श्री. राजबहादूर म्हणाले कीं, परदेशीय प्रवाशांना सध्यां उपलब्ध असलेल्या सोयींसवलतींत अधिक भर घालण्याचा सरकारचा उद्देश आहे; सरकारी मक्तेदारी स्थापन करण्याचा नाहीं. सरकारच्या ह्या निर्णयाला अनुसरून प्रवासी हॉटेल कॉर्पोरेशनची स्थापना करण्यांत आली आहे. ह्या कॉर्पोरेशनचे अधिकृत भांडवल ४ कोटी रुपयांचें असून आणखी तितक्याच रकमेचें कर्ज सरकार कॉर्पोरेशनला देणार आहे. प्रवाशांना आकर्षित करणारी भारतामधील जी ठिकाणें आहेत, त्या ठिकाणीं अधिक प्रवाशांची राहण्याची सोय करण्यासाठी कॉर्पोरेशन हॉटेल्स बांधणार आहे. मुंबई, कलकत्ता, औरंगाबाद, दिल्ली, मद्रास, मदुरा, भुवनेश्वर, आग्रा, बनारस, कोणारक, इत्यादि ठिकाणीं हॉटेल्स बांधण्याचें काम कॉर्पोरेशन हातीं घेईल. ह्या सर्व ठिकाणीं मिळून १,२०० जादा खोल्यांची सोय करण्यांत येईल. दुसरें कॉर्पोरेशन प्रवाशांची रस्त्यावरील वाहतुकीची व्यवस्था पाहील, आणि त्यांना लागणाऱ्या वस्तूंची दुकानें काढील. ह्या दुकानांतून परदेशांतून आयात केलेल्या वस्तू परदेशीय हौशी प्रवाशांना पुरविल्या जातील. परदेशीय चलनांत किंमत घेऊन प्रवाशांना फोटो घेण्याचें साहित्य, सौंदर्यप्रसाधनें, सिगारेटस, इत्यादी माल विकत देण्यांत येईल. दिल्ली, कलकत्ता व मद्रास येथील विमान-तळावर आयातकर माफ असलेली दुकानें मुद्दाम खोलण्यांत येणार आहेत. परदेशीय प्रवाशांचें मनोरंजन करण्याचें कामहि हे कॉर्पोरेशन करील.

## खाणी-इंजिनिअर्सना पुरेसे काम नाहीं.

भारतामधील बेकारीचा प्रश्न सोडविण्याच्या कामीं तीन पंचवार्षिक कार्यक्रम करूनहि फारसे यश येणार नाहीं हें आतां मान्य करण्यांत आलें आहे. तथापि, बेकारीची भीति कुशल व्यावसायिकांना – त्यातहि कोणत्या तरी प्रकारच्या उत्पादनाशीं प्रत्यक्ष संबंध असलेल्या व्यावसायिकांना – नाहीं अशी समजूत असते. ह्या समजुतींत थोडेफार तथ्य असलें तरी ती १०० टक्के खरी नाही, हे खाणी इंजिनिअरांमधील बेकारीनें दिसून येतें. खाणी इंजिनिअर्सपैकीं सर्वांना काम मिळू शकत नाहीं, असे गेल्या वर्षी आढळून आलें. इंजिनिअर्सच्या ह्या बेकारीचीं दोन मुख्य कारणें आहेत. कोळशाच्या खाणींच्या उत्पादनाचें उद्दिष्ट कमी करण्यांत आलेलें आहे, हे एक; आणि कोळशाच्या खाणींचें करण्यांत येत असलेलें यांत्रिकीकरण हे दुसरें. शिवाय, कोळशाच्या लहान खाणी कमी करून त्यांचे एकत्रीकरण करण्यांत येत आहे. परिणामी कोळसाखाणींतील रोजगाराच्या संधी कमी झाल्या आहेत व होत आहेत. ४ थ्या पंचवार्षिक कार्यक्रमांतील कोळशाच्या उत्पादनाचें उद्दिष्ट २० कोटी टन ठरविण्यांत आलें होतें. परंतु, आतां तें १२·५ ते १३·५ कोटी टनांपेक्षा अधिक असणार नाहीं. भारत सरकार कोळसा खाणी इंजिनिअर्समधील बेकारी कमी करण्याचा प्रयत्न करीत आहे. आफ्रिकेंतील देशांतून भारतामधील खाणी इंजिनिअर्सना नोकऱ्या मिळण्याची शक्यता अजमावण्याची सूचना भारत सरकारनें आपल्या प्रतिनिधींना केली आहे. दरम्यान, इंडिअन माईन मॅनेजर्स असोसिएशननें अशी सूचना केली आहे कीं, येत्या दोन वर्षांत खाणी इंजिनिअर्सच्या अभ्यासक्रमासाठी नव्या विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यांत येऊं नये.

माधवाश्रम लि. भोजनाची व राहण्याची उत्कृष्ट सोय. विवाहकार्याची संपूर्ण व्यवस्था. गिरगांव, मुंबई ४.


महाराष्ट्र सरकारनें
तगाईवर मंजूर केलेले
"विजय" नांगर
वापरा. ४, ६ व ८ बैली
फाळ व सुटे भाग
तसेंच विजय सेंट्रिफ्युगल पंप्स्






१" ते ४" बेल्ट ड्राइव्ह व डायरेक्टर कपल्ड, शिवाय
बोअरिंगचे हँड पंप्स्, हँड रहाट इ. इ.
– न्यू विजय इंडस्ट्रीज लि. –
विश्रामबाग – सांगली (महाराष्ट्र)

STUDIO SARJERAO




मुदतीच्या ठेवींवर आपण आतां युनायटेड वेस्टर्न बँकेंत
पावणे सात टक्के
पर्यंत व्याज मिळवूं शकता.

युनायटेड वेस्टर्न बँकेंत आपली ठेव ठेवणें केव्हांहि आपल्या हिताचें आणि फायद्याचेंहि आहे.

दि युनायटेड वेस्टर्न बँक लि., सातारा
(स्थापना) १९३६
बँकिंगचे सर्व तऱ्हेचे व्यवहार केले जातात.

अंबरनाथ व नातेपुतें
येथें बँकेच्या नवीन शाखा लौकरच सुरू होत आहेत.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनीं छापिलें व 'दुर्गाधिवास' ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४, येथें प्रसिद्ध केलें.